Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 13 April 2025

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १३ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- दुर्गराज रायगड हे पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ करण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांचं नियोजित स्मारक पूर्णत्त्वास नेण्यासाठी राज्यशासन कसोशीने प्रयत्न करेल-मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन
- हनुमान जयंती सर्वत्र उत्साहात साजरी-विविध मंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी गर्दी

आणि

- अमेरिकेत झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्टेज-वन च्या कंपाउंड मिश्र सांघिक स्पर्धेत भारताला सुवर्णपदक

****

दुर्गराज रायगड हे पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ करण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्त काल झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. शालेय विद्यार्थ्यांनी रायगडाला प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे, यासाठी उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली. छत्रपती

शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे, त्यांना महाराष्ट्रापुरता मर्यादित ठेवू नका असं आवाहन, शहा यांनी केलं. ते म्हणाले..

**बाईट – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा**

****

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी बोलतांना, छत्रपतींचा प्रमाण इतिहास लिहिण्याचं काम सरकारकडून केलं जाईल, अशी घोषणा केली. अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक उभारण्याचा प्रकल्प न्यायप्रविष्ट असल्यानं थांबला असून, हे स्मारक पूर्णत्त्वास नेण्यासाठी राज्य शासन कसोशीने प्रयत्न करेल असं आश्वासन दिलं. दिल्लीतही छत्रपतींचं स्मारक उभारावं अशी मागणी फडणवीस यांनी केली. ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी यावेळी केलेल्या भाषणात, छत्रपती शिवरायांशी संबंधित पर्यटन स्थळांचं सर्किट विकसित करण्याची मागणी केली.

या कार्यक्रमापूर्वी अमित शहा यांनी पाचाड इथं राजमाता जिजाऊ साहेबांच्या समाधीला वंदन केलं. राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांना केवळ जन्मच दिला नाही, तर हिंदवी स्वराज्याची प्रेरणा तसंच स्वातंत्र्याचा विचारही दिला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, मुंबईत चित्रलेखा या गुजराथी साप्ताहिकाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमालाही शहा काल उपस्थित होते, या साप्ताहिकाच्या वाटचालीला त्यांनी शुभेच्छा दिल्या.

****

देशभरात सध्या पोषण पंधरवडा राबवण्यात येत आहे. या अंतर्गत गरोदर तसंच स्तन्यदा माता, आणि बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीनं सकस आहार पुरवण्यावर भर दिला जात आहे. अहिल्यानगर ग्रामीणचे बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक म्हेत्रे यांनी याविषयी माहिती दिली....

**बाईट – दीपक म्हेत्रे**

****

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उद्या १४ एप्रिलला साजरी होत आहे. त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला करून देण्यासाठी तसंच सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी पर्यटन संचालनालयामार्फत, मुंबई, नाशिक आणि नागपूर इथं १४ आणि १५ एप्रिल रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचं आयोजन करण्यात येत आहे. या सहलीमध्ये बाबासाहेबांच्या जीवनाशी निगडित महत्त्वाच्या स्थळांचा समावेश असून, या सहली विनाशुल्क आयोजित करण्यात येत आहेत, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

दरम्यान, आज सर्व जिल्हा मुख्यालयी “जयभीम पदयात्रा” आयोजित करण्यात येत आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार ही पदयात्रा जिल्हास्तरावर भव्य स्वरूपात साजरी होत आहे. धाराशिव, बीड तसंच नांदेड इथं जिल्हा क्रीडा संकुलावरून तर लातूर इथं दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावरून या पदयात्रेला सुरूवात होत आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे छत्रपती संभाजीनगर इथं आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांना किमान एक वही आणि एक पेन दान करण्याचं आवाहन करण्यात आलं असून, हे साहित्य स्वीकारण्यासाठी पैठण गेट इथं व्यासपीठ उभारण्यात आलं आहे.

****

'संवाद मराठवाड्याशी' या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या काल पहिल्या दिवशी छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यातल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातल्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या या कार्यक्रमात बचत गटातल्या महिलांनी आपल्या समस्या मांडल्या. या समस्यांचं तातडीने निराकरण करण्याचे निर्देश आयुक्त गावडे यांनी दिले. या उपक्रमांतर्गत बुधवारी १६ तारखेला विभागीय आयुक्त विभागातल्या गरजू शेतकऱ्यांसोबत शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत संवाद साधणार आहेत.

****

हनुमान जयंती काल सर्वत्र भक्तिभावाने साजरी झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खुलताबाद इथं काल पहाटे हनुमानाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. शयनस्थितीत असलेल्या या भद्रा मारुतीचं दर्शन घेण्यासाठी भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. माजी खासदार चंद्रकांत खैरे, राज्याचे बहुजन विकास मंत्री अतुल सावे यांच्यासह मान्यवरांनी भद्रा मारुतीला अभिषेक करून आरती केली. छत्रपती संभाजीनगर शहरातही प्राचीन सुपारी हनुमान मंदिरासह सर्वच हनुमान मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

अहिल्यानगर जिल्ह्यात संगमनेर इथं महिलांनी हनुमानाचा रथ ओढून हनुमान जयंती साजरी करण्याची परंपरा चालत आली आहे. कालही हनुमान जन्म सोहळ्यानंतर विधिवत पूजा झाल्यावर महिलांनी रथ ओढला, हनुमानाचा रथ ओढण्याचा मान महिलांना देणारं, संगमनेर हे राज्यातलं एकमेव शहर आहे.

****

तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेची चैत्री पौर्णिमा यात्रा सुरु असून, भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. चैत्री पौर्णिमेनिमित्त देवीच्या गाभाऱ्यात विविध आकर्षक फुलांसह आंब्याची आरास करण्यात आली आहे.

दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात येरमाळा इथल्या येडेश्वरी यात्रेलाही काल प्रारंभ झाला असून, आज चुनखडी वेचण्याचा कार्यक्रम आहे.

****

खान्देश कुलस्वामिनी श्री एकवीरा देवीची काल चैत्र पोर्णिमेनिमित्त धुळे शहरातून रथ यात्रा काढण्यात आली. यावेळी खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्यासह मान्यवरांनी एकवीरा मातेचं आणि रथाचं पूजन केलं.

****

नागपूर जिल्ह्यात उमरेड स्फोट प्रकरणी मृत कामगारांच्या कुटुंबाला प्रत्येकी ६० लाख रुपये, तर जखमींना ३० लाख रुपये मदत जाहीर करण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपुरात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मृतांच्या तसंच जखमींच्या परिवारातल्या वारसांना नोकरीचं आश्वासनही कंपनी प्रशासनाने दिलं आहे.

****

अमेरिकेत फ्लोरिडा इथं झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्टेज-वन च्या कंपाउंड मिश्र सांघिक स्पर्धेत भारताला सुवर्णपदक मिळालं. ऋषभ यादव आणि ज्योती सुरेखा वेन्नम या जोडीनं काल झालेल्या अंतिम सामन्यात चीनी तैपेईच्या हुआंग इ-जो आणि चेन चिये-लुन या जोडीचा १५३-१५१ असा पराभव केला.

****

परभणी इथं अत्याधुनिक अग्निशमन वाहनांचं पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते काल उद्घाटन झालं. आपत्कालीन घटनांना जलद प्रतिसाद देण्यासाठी अद्ययावत आणि अत्याधुनिक अशी तीन छोटी बचाव वाहनं, परभणी शहर महानगरपालिकेसह गंगाखेड, सेलू आणि जिंतूर नगरपालिकेसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

****

**हवामान**

राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ३९ पूर्णांक चार अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ३९ पूर्णांक सहा तर परभणी इथं ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

दरम्यान, हवामान विभागाने आज उद्या यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड आणि सोलापूरमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

****